# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


२६) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ३०.०५.२०२५

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (२३/०५/२०२५ ते २९/०५/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (३१/०५/२०२५ ते ०४/०६/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | दिनांक | ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| २.० | ५.६ | ३.० | ७७.६ | २७.२ | १.४ | ०.० | पाऊस (मिमी) | ४ | २ | २ | ३ | ३ |
| ३५.२ | ३४.४ | ३३.४ | ३२.८ | ३२.२ | ३१.८ | ३२.२ | कमाल तापमान (अंसे) | ३३ | ३३ | ३४ | ३४ | ३३ |
| २१.९ | २१.३ | २०.९ | २१.१ | २१.३ | २१.७ | २२.१ | किमान तापमान (अंसे) | २४ | २४ | २४ | २४ | २३ |
| ६.० | ६.० | ६.० | ६.० | ६.० | ४.० | २.० | ढग स्थिती (आकाश) | ६ | ५ | ५ | ४ | ४ |
| ९३ | ९३ | ९२ | ९२ | ९३ | ८९ | ८७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८५ | ८५ | ८२ | ८२ | ८३ |
| ४६ | ५१ | ५० | ५२ | ५९ | ५१ | ५९ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ६५ | ६५ | ६५ | ६६ |
| १.९ | १.२ | १.० | १.१ | १.२ | १.४ | १.३ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | २१ | २५ | २१ | २० | २० |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच पुढील पाच दिवस काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | विजेचा पुर्वानुमान मिळणेकरीता दामिनी मोबाईल अपचा वापर करावा.<br>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | पाऊसाची उघडीप मिळाल्यानंतर व वापसा आपल्यानंतर राहिलेली मशागतीची कामे पूर्ण करून घ्यावीत. |
| खरीप नियोजन | - | शेतामध्ये पावसाचे पाणी साठून राहणार नाही यासाठी व अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी शेतातून पाणी बाहेर काढण्याची व्यवस्था करावी.<br>वापसा आल्यानंतर कुळवाने मशागत करावी म्हणजे उगवलेल्या ताणाचा बंदोबस्त होईल व शेत पेरणी योग्य होईल.<br>हवेतील उष्णता मृग नक्षत्राच्या आसपास कमी होवून जमिनीतील किडीचा मुख्य पिकांवर प्रादुर्भाव होणार नाही व तणाचाही प्रादुर्भाव कमी होईल.<br>खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| कपाशी | - | जमीनीतील तापमान कमी झालेले नसतानाही लागवड केल्यास कीड व रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते, त्यामुळे जमीनीतील तापमान कमी झाल्याशिवाय लागवडीची घाई करू नये. |
| कोरडवाहू पिके | - | हलक्या जमिनीत वापसा आल्यानंतर कुळवाने पूर्व मशागत करून बियाण्यास फुले सुपर बायोमिक्सची बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी.<br>कोरडवाहू भागात ज्या ठिकाणी जमिनीची पूर्व मशागत झालेली असल्यास आणि पेरणी योग्य १०० मी मी पेक्षा जास्त पाऊस झाला आहे अशा ठिकाणी वापसा आल्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे खाली नमूद केल्या प्रमाणे पेरणी करावी.<br>हलकी जमीन : हुलगा, मटकी<br>मध्यम व भारी जमीन : उडीद, मूग, चवळी, सूर्यफूल, तूर<br>आंतरपिक पद्धत:<br>येत्या कालावधी मधील पावसाची अनिश्चितता लक्षात घेता, कोरडवाहू विभागामध्ये तूर + सूर्यफूल (२:१), तूर + बाजरी (२:१), तूर + मूग / उडीद (२:१) आंतरपीक पद्धतीचा अवलंब फायदेशीर ठरू शकेल. |
| ऊस | - | हुमणी अळीच्या भुग्याचे नियंत्रण<br>हुमणी आळीच्या भुग्याचा वावर हा प्रामुख्याने संध्याकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान असतो. त्याकरीता एकरी एक प्रकाश सापळा संध्याकाळी ६ ते ८ वाजेच्या दरम्यान लावावा. |
| पशूसंवर्धन | - | जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रण पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे. कोवळ्या गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळ्याचा वापर करावा.<br>जनावरांना मोकळ्या जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे.<br>पावसाचे वातावरण आणि विजेचा गडगडाट होत असल्यास शेतातील कामकाज त्वरित थांबवून जनावरांना बंदिस्त आणि सुरक्षित ठिकाणी हलवावे. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | गोठ्यातील छत आणि भिंती धातूच्या नसाव्यात, कारण धातू वीज आकर्षित करतात.<br>अचानक आलेल्या वादळाच्या वेळी जर तुमचे केस उभे राहत असतील किंवा त्वचेला मुंग्या येत असतील तर तुमच्यावर वीज कोसळण्याची शक्यता आहे. स्वतःचे रक्षण करण्यासाठी तात्काळ जमिनीवर पाय गुडघ्यात दुमडून एकमेकांना जोडावे, त्याभोवती हातांचा विळखा घालावा व हनुवटी गुडघ्यावर दाबून धरावी. जनावरांना खाली बसवावे. वातावरण निवळल्यानंतर तात्काळ आश्रयस्थान गाठावे.<br>अचानक गडगडाट होत असल्यास व सभोवताली फक्त झाडेच असतील तर अशा वेळी झाडाच्या उंचीच्या दुप्पट अंतरावर जमिनीवर वाकून बसावे.<br>जनावरे पाण्यात असतील तर तात्काळ त्यांना बाहेर काढा. |
| **पाण्याचे पूर्नभरण** | - | पाणी जमिनीत जास्तीत मुरेल व वाहून जाणार नाही याचा प्रयत्न करावा. घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी पाइपद्वारे एखाद्या टाकीत जमा करावे व त्याचा वापर विहिर पुर्नभरण किंवा बोअरवेल पूर्नभरण करण्यासाठी वापरावे. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : ३०.०५.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**